**मंगलाबाई भागवत फाउंडेशन**

**वेळ : २ तास** **विषय : इतिहास राज्यशास्त्र (कृतिपत्रिका)** **गुण : ४०**

---

**सूचना :** i) **सर्व कृती /प्रश्न सोडवणे आवश्यक आहे.**

ii) **उजवी कडील अंक प्रश्नाचे/कृतींचे गुण दर्शवतात.**

iii) **प्रश्न/कृती क्र.१ ते ५ इतिहासावर, तर प्रश्न/कृती क्र. ६ ते ९ राज्यशास्त्रावर विचारलेले आहेत.**

iv) **प्रश्न क्र. १ (अ) व प्रश्न क्र. ६ मध्ये संपूर्ण विधाने लिहिणे आवश्यक आहे.**

v) **प्रश्न क्र. २ (अ) आणि ८ (ब) मध्ये दिलेली संकल्पना चित्रे कृतिपत्रिकेनुसार पेनाने उत्तर पत्रिकेत तयार करणे अपेक्षित आहे.**

vi) **प्रश्न क्र. १ (ब) मधील प्रत्येक संचातील फक्त चुकीची जोडी ओळखून लिहिणे अपेक्षित आहे.**

vii) **प्रश्न क्र. (अ), १ (ब) व ६ या प्रश्नांची उत्तरे एकापेक्षा अधिक वेळा लिहिलेली असल्यास प्रथम लिहिलेली उत्तरेच गुणांसाठी गृहीत धरली जातील.**

**प्र.** 1 **अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.** (3)

1) भारतातील पहिले इंग्रजी वर्तमानपत्र ............. यांनी सुरु केले.

अ) जेम्स ऑगस्टस हिकी ब) सर जॉन मार्शल क) ॲलन ह्यूम

ड) माउंट स्टुअर्ट एल्फिस्टन

2) संपूर्ण युरोपाची भव्य वर्तुळाकार सहल.................. याने यशस्वीपणे घडवून आणली.

अ) थॉमस कुक ब) गेरहार्ट मार्केटर क)बेंजामिन ट्युडेला ड) मार्को पोलो

3) ६ जानेवारी हा दिवस महाराष्ट्रात............... म्हणून साजरा केला जातो.

अ) वृत्तपत्र दिन ब) मुद्रण दिन

क) पत्रकार दिन ड) नियतकालिक दिन

**ब) पुढीलपैकी प्रत्येक गटातील चुकीची जोडी ओळखून पुन्हा लिहा.** (3)

1) i) लाल किल्ला – उदयपूर

ii) जंतर मंतर – जयपूर

iii) बृहदिश्वर मंदिर – तंजावर

iv) कॅपिटल कॉम्पलेक्स – चंडिगढ

2) i) महाराज सयाजीराव विद्यापीठ– दिल्ली

ii) बनारस हिंदू विद्यापीठ – वाराणसी

iii) अलिगढ मुस्लीम युनिव्हर्सिटी– अलिगढ

iii) जिवाजी विद्यापीठ – ग्वालियर

3) i) द राईज ऑक द मराठा पॉवर – न्या.म.गो.रानडे


ii) मराठ्यांच्या इतिहासाची साधने– विष्णु शास्त्री चिपळूणकर

iii) मराठ्यांची रियासत – गोविंद सखाराम सरदेसाई

iv) गुलामगिरी – महात्मा फुले


**प्र. 2 अ) दिलेल्या सूचनेनुसार कृती करा. (कोणत्याही दोन)** (4)

1) **पुढील तक्ता पूर्ण करा.**




2) **प्राचीन ऑलिम्पिक स्पर्धांनी हे सामने सुरु केले.** (2)



3) **नैमित्तिक पर्यटनाची कारणे –**  (2)

**प्र. 2 ब) थोडक्यात टिपा लिहा. (कोणतेही दोन)** (4)

1) स्थल कोश

2) प्रसार माध्यमांशी संबंधित व्यावसायिक क्षेत्रे

3) वंचितांचा इतिहास

**प्र. 3 पुढील विधाने सकारण स्पष्ट करा. (कोणतेही दोन)** (4)

1) चित्रपट माध्यमात इतिहास हा विषय महत्वाचा आहे.

2) खेळांच्या समालोचकाला क्रीडा इतिहासाच्या अभ्यासाची गरज असते.

3) व्हाल्टेअर याला आधुनिक इतिहास लेखनाचा जनक म्हणतात.

4) वैद्यकीय कारणासाठी परदेशी लोकांचे भारतात येण्याचे प्रमाण वाढले आहे.

**प्र. 4 दिलेल्या उताऱ्याचे वाचन करुन खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.** (4)

"सोहगौडा ताम्रपट" हा ताम्रपट सोहगौडा (जिल्हा–गोरखपूर, उत्तर प्रदेश) येथे सापडला. हा ताम्रपट मौर्य काळातील असावा असे मानले जाते. ताम्रपटावरील कोरीव लेख ब्राम्ही लिपीत आहे. लेखाच्या सुरवातीस जी चिन्हे आहेत त्यातील पारासहित असलेला वृक्ष तसेच पर्वत (एकावर एक असलेल्या तीन कमानी) ही चिन्हे प्राचीन आहेत. नाण्यांवरही आढळतात. चार खांबांवर उभे असलेले दुमजली इमारतीप्रमाणे दिसणारे चिन्ह कोठाराचे निदर्शक असावेत, असे अभ्यासकांचे मत आहे. या कोठार घरांमधील धान्य जपून वापरण्यात यावे, असा आदेश त्या लेखात दिलेला आहे. दुष्काळजन्य परिस्थितीचे निवारण करण्यासाठी काय काळजी घ्यावी, या संदर्भातील हा आदेश असावा असे मानले जाते.

1) सोहगौडा हा ताम्रपट कोठे सापडला ? (1)

2) सोहगौडा ताम्रपटावरील कोरीव लेख कोणत्या लिपीमध्ये लिहिलेला आहे ? (1)

3) सोहगौडा ताम्रपटाचे इतिहासाचे साधन म्हणून महत्व स्पष्ट करा. (2)

**प्र.** 5 **पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा. (कोणत्याही दोन)** (6)

1) अभिलेखागराच्या व्यवस्थापनात कोणती कामे महत्वाची आहेत ?

2) वृत्तपत्रे व नियतकालिके यातील फक्त स्पष्ट करा.

3) आधुनिक इतिहास लेखन पद्धतीची चार वैशिष्ट्ये कोणती ?

4) किर्तनाचे स्वरुप स्पष्ट करा.

**प्र.** 6 **दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.** (2)

1) डॉ. राजेंद्र सिंह यांनी राजस्थान मध्ये ......... घडवून आणली.

अ) धवल क्रांती ब) जल क्रांती

क) हरित क्रांती ड) ग्राहक क्रांती

2) .............. अधिकारामुळे शासनाच्या कारभारातील गोपनीयता कमी झाली आहे.

अ) समानतेच्या ब) स्वातंत्र्याच्या

क) माहितीच्या ड) सामाजिक न्यायाच्या

**प्र.** 7 **पुढील विधाने चूक की बरोबर ते सकारण स्पष्ट करा. (कोणतेही** 2**)** (4)

1)शिरोमणी अकाली दल हा राष्ट्रीय पक्ष आहे.

2)संविधानाचे स्वरुप एखाद्या जिवंत दस्ताऐवजाप्रमाणे असते.

3)चळवळीला खंबीर नेतृत्वाची गरज नसते.

**प्र.** 8 **अ) पुढील संकल्पना स्पष्ट करा. (फक्त एक)** (2)


1) मतदार संघाची पुनर्रचना

2) पक्ष पद्धती

**प्र.** 8 **ब) दिलेल्या सूचनेनुसार कृती करा. (कोणतीही एक)** (2)

1) पुढील संकल्पना चित्र पूर्ण करा.

लोकशाहीची मूल्ये



2) स्वातंत्र्य पूर्व काळात आदिवासींचे झालेले उठाव.

बिहार | ओडिशा | छोटा नागपूर | महाराष्ट्र

**प्र.** 9 **पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. (फक्त एक)** **(**2**)**

1) ईव्हीएम मशीन वापरामुळे कोणते फायदे झाले ?

2) भारतातील शेतकरी चळवळीचे स्वरुप स्पष्ट करा?

*****